व्यासपीठावरील आणि सभागृहातील मान्यवर आणि बंधुभगिनीना:

'महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कार' प्रदान समारंभाच्या निमित्तानं आपण सर्वजण आज इथे जमलो आहोत. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' ने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मला देऊन, माझाही एक प्रकारे सन्मान केला आहे. हयाबद्दल मी सुरुवातीलाच आयोजकांचे आभार मानतो.

१९९४ पासून हे पुरस्कार दिले जात आहेत आणि यापूर्वीच्या काही समारंभांना मी, श्रोता म्हणून उपस्थित राहिलेलो. माझी पत्नी प्रा. मीना गोखले ही दोन वर्ष साहित्य पुरस्कार निवड समितीची सदस्य होती आणि त्यामुळेही या योजनेशी मी परिचित आहे.

'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे/उदास विचारें वेच करी।। हया तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे अमेरिकेत सुस्थितीत असलेले सुनील देशमुख आणि त्यांची मित्रमंडळी यांनी गेली १४ वर्ष हा उपक्रम सातत्याने चालवला आहे आणि मराठी भाषिक समाजात हया पुरस्कारांना एक विशेष प्रतिष्ठाही प्राप्त झाली आहे. त्याबद्दल त्यांचा मनपूर्वक अभिनंदन केले पाहिजे. हया पुरस्कारांचा विशेष म्हणजे कित्येकदा, 'महाराष्ट्र फाउंडेशनने आधी पुरस्कार दिले आहेत आणि त्यानंतर त्या पुस्तकांना आणि व्यक्तींना राजमान्यता मिळालेली आहे. उदाहरण द्यायचे झालं तर, आशा बेग यांची 'भूमी' ही कांदबरी आणि प्रा. गो.मा. पवार यांचा 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य' हा चरित्रग्रंथ या दोन्ही पुस्तकांना आधी 'महाराष्ट्रा फाउंडेशनने पुरस्कार दिले आणि त्यानंतर साहित्य अकादमीचे पुरस्कार प्राप्त झाले. आज गौरव पुरस्कार मिळालेल्या काही व्यक्ती – विचारवंत प्रा. भा. ल. भोळे आणि कृतिशील नेते एन. डी. पाटील – माझ्यापेक्षा वयाने आणि कतृत्वानेही कितीतरी मोठे आहेत. त्यांना मी विन्रम अभिवादन करतो आणि सर्व पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

साहित्य आणि समाजकार्याचे पुरस्कार देताना असा विचार मनात येतो की, काही माणसं चागली साहित्यनिर्मिती करतात, काही सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून देतात,

हे अस का करतात? अर्थातच त्यांना लिहिल्यावाचून राहवत नाही किंवा कोणी त्यांना आग्रह करतात आणि ती मंडळी लिहितात. समाजिक कामात पडलेली मंडळीही त्यांना समाजपरिस्थिती बदलली असं वाटत असतं म्हणूनच हया क्षेत्रात उतरतात. काही, नंतर विनाकारण लिहीत राहतात किंवा काही स्वार्थाचे राजकारण करतात. त्यांना आपण सोडून देऊ परंतु या व्यक्ती तळमळीनं आणि तत्वनिष्ठेने हया दोन्ही क्षेत्रांत राहतात त्याच्याच हातून मोलाचं कार्य होत आणि अशा लेखकांचा आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा कृतज्ञतेने गौरव करण्याची गरज असते आणि ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ ही महत्वाची गरज पुरी करत आहे ही फार मोठी गोष्ट आहे.

आज ही गरज अधिकच वाटत आहे. ‘सारेच दीप कसे मंदावले आता’ अशा परिस्थिती आज बऱ्याच वेळा जाणवत आहे. भारतीय भाषा आणि विशेषत: मराठी भाषेसंबंधी एक विचित्र परिस्थिती सध्या दिसून येत आहे. एका बाजूला; आपण राज्यकारभार आपल्या भाषेत चालला पाहिजे म्हणून आग्रही आहोत, भारतीय राज्यघटनेमध्ये दुरुस्ती करुन, वयाच्या १४ वर्षापर्यत प्रत्येक मुलाला शिक्षणाचा अधिकार आपण दिला आहे; घटनेच्या, कलम ३५० अ प्रमाणे अल्पसंख्यांकांनासुध्दा प्राथमिक शिक्षण आपल्या भाषेत मिळण्याची संधी देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. दुसऱ्या बाजूला सर्व शहरी भाग आणि मोठया गावांमधून इंग्रजी माध्यमाच्या शाळांचं उदंड पीक आलं आहे आणि ते वाढत चालल आहे. इंग्रजी नुसत चांगल आलंच पाहिजे असं नाही तर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना घातलं पाहिजे असा पालकांचा आग्रह आहे. आज एका बाजूला, ‘वानप्रस्थ’ लिहिणारे गणेश देवी, अदिवासी बोली जतन करण्याचा प्रयत्न करत आहेत तर दुसऱ्या बाजूला त्यांच्याच शहरात म्हणजे बडोद्यात आणि सर्व मोठया शहरांमध्ये पालकांची धडपड आपली मुलं इंग्रजी शाळांमध्ये पाठवण्याची आहे. सिधुदुर्ग जिल्हा झाला तेव्हा त्याची राजधानी कुडाळला असावी का सावंतवाडीला असावी असा वाद झाला होता आणि सावंतवाडीला इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत असा मुद्दा आग्रहांन मांडण्यात आला होता आज, बहुतेक राजकीय पुढारी, मंत्री आणि साहित्यिक यांची मुल मराठी माध्यमात शिकलेली नाहीत. त्यांना मराठी भाषा, समाज संस्कृती

याची जुजबी माहितीसुध्दा नाही. दुसऱ्या बाजूला खाली जमीन, वर आकाश' लिहिणारे डॉ. सुनीलकुमार लवटे आणि 'तमाशाची रांगडी गंमत' चित्ररुपात दाखवणारे संदेश भंडारे यांनी वर्णन केलेली कधीही शाळेत न गेलेली किंवा कष्टानं शिक्षण घेणारी मुलं आहेत. समाजातल्या हया दोन थरांतली विषमता वाढत चालली आहे. 'मराठी असे आमुची मायबोली, तरी आज ती राजभाषा नसे' असं म्हणण्याऐवजी, सुशिक्षितांमधला एक मोठा विभाग, 'मराठी असे आमुची राजभाषा, जरी आमुची ती मायबोली नसे' असं उलट म्हणण्यापर्यंत गेला आहे, आणि दु:खाची गोष्ट अशी की, १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर ही प्रवृत्ती वाढत गेली आहे.

मी, हयाच भागातला इथून जवळच असलेल्या गुडविल बिल्डिंगध्ये माझं लहानपण गेल. आमच्या वेळची झाडून सगळी मुलं मराठी माध्यमाच्या शाळेत जात होती. त्यात कुणालाही कमीपणा वाटत नव्हता. इंग्रजी चांगल होण्यासाठी आमच्या शिक्षकांनी आणि आई वडिलांनी प्रयत्न जरुर केले. कॉलेजमध्ये गेल्यावर इंग्रजी माध्यम होतं. पण कुठेही आमचं अडल नाही. आमच्या बरोबरची सगळी मुलं चांगली शिकली, इंजिनिअर, डॉक्टर, वकील झाली. काही परदेशात गेली. कुठेही त्यांच अडल नाही. १९६०–६५ नंतर मात्र परिस्थिती बदलत गेली. अधिक संख्यने मुलं इंग्रजी माध्यमात जावू लागली. आज तर इंग्रजी माध्यमात न पाठवणं हा मूर्खपणा ठरु लागला आहे! कुठलाही भाषिक आणि प्रादेशिक अभिनिवेश न बाळगता, मी विचारु इच्छितो की आपलं साहित्य इतक टाकाऊ आहे का? की, त्याच्यापासून आपली नाळ तुटावी? गेल्या ७०० वर्षात, हया लोकसमूहानं आपली भाषा वाढवली. अगदी थोडी उदाहरणं द्यायची तर ज्ञानेश्वर, तुकाराम यांची संतवाणी;

मराठयांच्या राज्याला ललकारणारे शाहिरी पोवाडे, विंदा करंदीकर, केशवसुत, मर्ढेकर, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांची समकालीन कविता, चिं.वि. जोशी आणि पु. ल. देशपांडे यांचा विनोद, हरि नारायण आपटे, श्री. ना. पेंडसे, भालचंद्र नेमाडे आणि आशा बेग यांच्या कादंबऱ्या, बालगंधर्वापार तेंडुलकर, एलकुंचवारांपर्यंतची मराठी रंगभूमी, प्रभात, व्ही. शांताराम, राजा परांजपे आणि जब्बार पटेल यांचा सिनेमा; भीमसेन जोशी,

कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर यांचे संगीत आणि महात्मा जोतिबा फुले, न्या. रानडे यांच्यापासून डॉ. आपटे इथपर्यंतचा वैचारिक वारसा या सर्वांपासून आपण दूर जाणार आहोत का? आणि कशासाठी 'धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी, एवढया जगात माय मानतो मराठी ही सुरेश भटांची जाणीव कुठे आणि आज भारतात राहून परदेशी बनलेले भारतीय कुठे, माझा इंग्रजी भाषा शिक्षणाला विरोध नाही आणि एक वेळ, पहिलीपासून इंग्रजी शिकवणही मी समजू शकतो परंतु प्राथमिक शिक्षणही मातृभाषेतून नसावं? हया सगळयामुळे आपला शहरी समाज इतर जनांपासून तुटत चालला आहे. वेगळया प्रकारची सामाजिक विषमता वाढत चालली आहे आणि हे सर्व कशासाठी? तुम्ही जगात कुठेही गेलात, परदेशी संस्कृती कितीही आत्मसात केलीत तरी एक गोष्ट तुम्ही बदलू शकणार नाहीत आणि ती म्हणजे तुमच्या कातडीचा रंग. एका बाजूला जग एक येत आहे, जागतिकीकरण होत आहे आणि त्याचबरोबर प्रत्येक स्थानिक जनसमूहाला परकीय माणसं एक मर्यादेपलीकडे नको आहेत. महाराष्ट्रातल्या काही लोकांना इतर भारतीय इथे नको आहेत आणि इग्लंडमध्येही काळे लोक एका मर्यादेपलीकडे नको आहेत. वर्षानुवर्षे अफ्रिकेत, श्रीलंकेत, पाकिस्तानात राहिलेली भारतीय माणसं बाहेर फेकली जातात तेव्हा ती कुठे जातात? भारतातच येतात ना? तेव्हा शहरी भारतीयांनी आणि त्यांच अनुकरण करणाऱ्या ग्रामीण भारतीयांनीही आपली भाषा, समाज हयापासून फारकत घेण्याची जी प्रवृत्ती वाढवली आहे ती कुठे न कुठे रोखली पाहिजे. ही प्रवृत्ती त्यांच्याच हिताची नाही आहे.

शहरी भारतीयांना आणि उच्च मध्यमवर्गीयांना, समाजकार्य पुरस्कारांच्या निमित्तानं आणखी एक गोष्ट सांगण आवश्यक आहे. आमचे सगळयांचे डोळे आता अमेरिकेकडे लागलेले आहेत. परंतु आता अमेरिका तरी सुरक्षित आहे का? **(Information Technology)** माहिती तंत्रज्ञान; शेअर मार्केट आणि खासगीकरण यानेच समाजाचा विकास होईल अशी आमच्या मंडळींची धारणा आहे. परंतु हया क्षेत्रामध्ये किती लोक आहेत? **(Information Technology)** माहिती तंत्रज्ञान ही अखेर सर्व्हीस इंडस्ट्री **(Service Industry)** आहे. तिथे जाणाऱ्याचे पगार भरपूर असतात. परंतु हया

व्यवसायात किती माणस जाणार? मूलभूत उद्योग आणि शेती यांच्याकडे आपण दुर्लक्ष करणार का? एक टक्का लोकही हया आयटीआय इंडस्ट्रीयल मध्ये सामावले जावू शकत नाहीत. १०० कोटीहून अधिक लोकसंख्या असलेल्या देशाला पायाभूत उद्योग आणि संकर शेती वाढवण आवश्यक आहे. परंतू आज कारखाने बंद पडत आहेत आणि शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करीत आहेत. हया परिस्थितीवर आपण काय तोडगा काढणार? सुशिक्षितांनी याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

मध्यमवर्गीयांमध्ये आणखी एक खोड आहे आणि ती म्हणजे गांधी नेहरुंना नावं ठेवण्याची. काय त्यांनी देशाचं नुकसान केले? आपल्या आजूबाजूचे देश पाहा. सर्वत्र अराजकासारखी परिस्थिती आहे. आपल्या मर्यादा आहेत. परंतु इतर सर्व देशांपेक्षा आपल्या नेतृत्वानं पुष्कळ काळापर्यंत जबाबदारीन राजकारण केल आहे. गांधीजींनी हया प्रचंड देशात ज्या लोकांना जागृत अन् एकत्र केले ही काय साधी गोष्ट होती? सरदार पटेलांनी हा देश एकसंघ केला नेहरुंनी लोकशाही प्रणाली, आर्थिक नियोजन यांचा पाया घातला आणि डॉ. आंबेडकरांनी निर्मिलेल्या घटनेच्या आधारावर आज देश चालत आहे. न्याय—सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हे आपल्या घटनेचं उद्दिष्ट आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही.

आपल्या समोरचे प्रश्न मोठे आहेत गरीब शेतकरी, दलित, भटके—विमुक्त, आदिवासी यांच्या विकासाचा फार मोठा प्रश्न आहे पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी, वीज पुरवठा, आरोग्य, शिक्षण, रोजगार हया सर्व समस्या आहेत. मी ज्या उत्तर प्रदेशात सध्या आहे तिथे तर हया समस्या अधिकच बिकट आहेत. परंतु आज आपल्याकडे एक व्यवस्था आहे. तिला नावं न ठेवता ती अधिक चांगल्या रितीने राबवण्याची गरज आहे. कित्येक सरकारी अधिकारी आणि राजकीय पुढारी यांच्याविरुध्द आपल्या सर्वांच्याच गंभीर तक्रारी आहेत. कायदा हातात घेणं आणि हिंसा करण ही प्रवृत्ती समाजात वाढत आहे. आमच्या न्याय—व्यवस्थेतही सर्व काही उत्तम आहे अशी परिस्थिती नाही. लाखोंनी केसेस कोर्टात पडून आहेत आणि ............ तारखेशिवाय काही मिळत नाही. किमान, कायद्यानुसार राज्य चालवणं हेही कठीण होत आहे. परंतु,

दुसऱ्या बाजूला निष्ठेने आणि कष्टानं काम करणारीही माणसं आहेत. आज समाजकार्याचे पुरस्कार देत असताना हया सर्व परिस्थितीची जाणीव ठेवणं आवश्यक आहे. हेच मी म्हणेन.

आज, कुठूनही, कसाही पैसा मिळवण हयालाच महत्व आलं आहे. सामाजिक कार्याला नाही. चळवळीत जाणारे (म्हणजे चांगल्या अर्थाने), लोकसंघटन करणारे, हे मुर्ख समजले जातात. दूरदर्शनवर चटपटीत मालिका लिहिण हे महत्वाच झालं आहे. सकस साहित्यनिर्मितीला त्यामानानं किंमत उरलेली नाही. अशा हया प्रतिकूल वातावरणात, मराठी साहित्यातल्या नवीन आणि नेटान प्रागतिक प्रवाहांची दखल घेण आणि सामाजिक कार्य, निष्ठेने करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणं हे कार्य हया समारंभानिमित्त होत आहे. आपण बाकी मंडळी फार काही करु शकत नाही. परंतु मी म्हणालो त्याप्रमाणे आपण काही भूमिका घेऊ शकलो. तर तुम्ही जे लिहिल आहे आणि जे समाजकार्य करत आहात त्यात आम्ही तुमच्याबरोबर आहोत, हा विश्वास त्यांना देऊ शकतो.

आज संवेदनशील माणसांना हतबलता जाणवत आहे आणि गुड मंडळी संघटित होत आहेत. हया परिस्थितीत, हया लेखकांपासून, कार्यकर्त्यांपासून प्रेरणा घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. साने गुरुजींच्या शब्दांत, 'वैरभावाने विषमता नष्ट करण्याची साधना' आपल्याला करायची आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात कवी कुसुमाग्रज लिहून गेले.

'कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल, रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल

आजच्या काळोखातून, उद्याच्या उषःकालात आपण सर्व नवीन वर्षात जाऊ या ही भावना व्यक्त करुन मी आपला निरोप घेत आहे. सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

न्या. हेमंत गोखले

३०/१२/२००७